MHGA050003542020

# न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) देसाईगंज

**( न्यायाधीश : आ.ऋ. भडके )**

**किरकोळ फौजदारी अर्ज कं.-१०३/२०२०.**

**(CNR-MHGA050003542020)**

| | |
|---|---|
| **अर्जदार** | **श्री. धनंजय रामदास मस्के,**<br>वय अंदाजे-२७ वर्षे, धंदा-शेती,<br>राह.-कोरेगांव, तहसिल-देसाईगंज,<br>जिल्हा-गडचिरोली. |
| **- वि रु ध्द -** | |
| **गैरअर्जदार** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज,<br>तालुका-देसाईगंज, जिल्हा-गडचिरोली. |

**आ दे श (नि.क्र.०१ खाली)**
**(पारित दिनांक ०५ ऑगष्ट-२०२०)**

०१) अर्जदाराने सदरचा अर्ज दुचाकी मॉडेल-HERO HF DELUX कंपनी-HERO, इंजिन नं. HA11ENJ5J09253, चेसिस नं.-MBLHAR238J5J05076, चा ताबा मिळण्याकरीता केलेला आहे.

०२) अर्जदाराचे असे म्हणने आहे की, तो वाहनाचा मालक असून ते वाहन पोलीसांनी गुन्हा क्र. ०२५५/२०२० कलम १२(अ) मु.जु.का. अन्वये तपास कामाकरीता जप्त केले आहे. वाहन पोलीस स्टेशन, देसाईगंजचे आवारात उघडयावर ठेवण्यात आले असून खराब होण्याची शक्यता आहे. वाहन नसल्याने अर्जदाराला व कुटुंबीयांना इतरत्र ये-जा करण्यास होत असल्याने वाहनाचा ताबा पाहिजे आहे, करीता त्याने सदर मालमत्ता सुर्पूतनाम्यावर मिळण्याची विनंती केली.

०३) विद्वान सरकारी वकील व तपासी अंमलदाराचे असे म्हणणे आहे की, वाहन सोडल्यास अर्जदार हा ह्याच प्रकारचे गुन्हे करु शकतो व वाहनाचा वापर अशाप्रकारच्या गुन्ह्याकरिता करु शकतो. याकरीता वाहन सुर्पूतनाम्यावर सोडण्यांत येवू नये.

//०२//

०४) उभय पक्षाचे कथन व दस्ताऐवजांचे अवलोकन केले अर्जदाराच्या विद्वान वकीलाचा व विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

०५) अर्जदाराने सादर केलेले वाहनाचे तपशील वरुन दिसून येते की, अर्जदाराने सदर वाहन दिनांक ०९/११/२०१८ रोजी आर्यन मोटर्स, गडचिरोली यांचेकडून खरेदी केलेले आहे. अर्जदाराने सदरचे वाहनाची परिवहन कार्यालयात नोंदणी केली व त्या वाहनाला एम.एच.-३३-वाय.-३५०२ असा क्रमांक देण्यात आला. परंतु, अर्जदाराकडून नोंदणी प्रमाणपत्र कुठेतरी हरविले असल्याबाबतचे शपथपत्र अर्जदाराने निशानी क्रमांक-०७ अन्वये अभिलेखावर दाखल केलेले आहे. यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते की, अर्जदार हा सदरहु वाहनाचा कायदेशिर ताबेदार आहे. वाहनाला पोलीस स्टेशनच्या परिसरात उघडयावर ठेवणे, वाहनाच्या स्वास्थाच्या दृष्टीकोनातून बरोबर राहणार नाही, सबब, अर्जदाराला सदरचे वाहनाचा अंतरिम ताबा देणे न्यायाच्यादृष्टीने उचित ठरेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## // आ दे श //

(०१) सदरची दुचाकी नोंदणी क्रमांक एम.एच.-३३-वाय.-३५०२, मॉडेल-**HERO HF DELUX** कंपनी-**HERO**, इंजिन नं. **HA11ENJ5J09253**, चेसिस नं.- **MBLHAR238J5J05076**, या वाहनाचा ताबा अर्जदाराला खालील अटीवर देण्यात यावा :-

(i) अर्जदाराने वाहन सुपूर्तनाम्यावर मिळण्याकरीता रुपये ४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) चा सुपुर्तनामा बंधपत्र सादर करावे.

(ii) अर्जदाराने वाहनाचा रंग, प्रकार इत्यादीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

(iii) अर्जदाराने वाहन विक्री करु नये किंवा अन्य मार्गाने विल्हेवाट लावू नये.

(iv) अर्जदाराने वाहनाचा उपयोग याच प्रकारच्या गुन्हयासाठी करु नये.

(v) अर्जदाराने गुन्हयाच्या तपासा दरम्यान किंवा प्रकरणाच्या चौकशी व सुनावणी दरम्यान आदेश झाल्यास वाहन पोलीस स्टेशनमध्ये/कोर्टात आदेशाप्रमाणे हजर करावे.

(vi) अर्जदाराने वाहनाचे कागदपत्रांची प्रत पोलीस स्टेशनला सादर करावी.

(vii) संबंधीत पोलीस अधिकाऱ्याने सदरचे मालमत्ता अर्जदाराला सुप्रतनाम्यावर देण्यापूर्वी त्यांचे रंगीत छायाचित्र काढावे व सवीस्तर पंचनामा करावा.

(०२) सदर आदेश व सुपूर्तनाम्याची प्रत मुळ दोषारोपपत्र दाखल करते वेळेस सोबत जोडण्यांत यावी.

(०३) पोलीस ठाणे अधिकारी, देसाईगंज यांना आदेश कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Anandrao Rushi Bhadke

Digitally signed by Anandrao Rushi Bhadke
Date: 2020.08.05 11:50:35 +0530

स्थळ : देसाईगंज.
दिनांक:०५/०८/२०२० **न्यायदंडाधिकारी(प्रथम श्रेणी), देसाईगंज.**